# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८७** **दिनांक १०/०७/२०२१**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ड्रोन, पॅरा ग्लायडर्स, रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट उडविण्यास बंदी- पोलीस उपआयुक्त मुख्यालय यांचे मनाई आदेश लागू.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles यांचेवर नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधकात्मक निर्बंध घालणे गरजेचे असल्याने श्री. **विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)**, मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी मानवी जिवीतास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता आहे अशा "Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles " चा वापर यावर फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मनाई आदेश लागू केलेले आहेत. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांकडुन करण्यात येण-या हवाई सर्वेक्षणास व मा. पोलीस आयुक्त यांचेकडुन विशेष परवानगीने करण्यात येणा-या वापरास सदर मनाई आदेशातील तरतुदी लागु असणार नाहीत.

सदर आदेशाचा कालावधी हा **दिनांक १०/०७/२०२१ रोजी ००.०१ पासुन ते दिनांक ०९/०९/२०२१ रोजी २४.०० वाजे पावेतो** लागु राहील.

-----ooooo-----